प्रेसनोट दिनांक १०/०५/२०१९

# येरवडा पोलीस स्टेशन,पुणे

## एकटे राहणारे जेष्ठ नागरिक दाम्पत्याचे घरी जावून त्यांची भेट घेवून त्यांच्या अडी अडचणी समजावून घेतल्या व सुरक्षेबाबत मार्गदर्शन केले

कम्युनिटी पोलीसींग संकल्पने अंतर्गत येरवडा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र कदम यांचे मार्गदर्शनाखाली पो.उप.निरी. श्री. व्ही.जे.माने व महिला पो.नाईक सुषमा राजे यांनी स.नं. १९१/२, गणेशनगर, येरवडा, पुणे येथे एकटे राहणारे जेष्ठ नागरिक दाम्पत्य नामे- सौ. आशा सुरेश शिंदे, वय ६७ वर्षे, व त्यांचे पती श्री. सुरेश शिंदे, वय ७४ वर्षे यांचे घरी जावून त्यांची भेट घेतली. त्यांच्या अडीअडचणी समजावून घेतल्या. तसेच त्यांना त्यांचे सुरक्षिततेच्या दृष्टीने घ्यावयाची काळजी याबाबत तसेच फसवणूकीचे प्रकार, घरफोडी चोरी, चेन स्नॅचिंग असे गुन्हे घडू नयेत यासाठी काय खबरदारी घ्यावी याबाबत मार्गदर्शन केले. तसेच त्या दोघांनाही पुणे शहर पोलीस आयुक्त कार्यालय येथे जेष्ठ नागरिक, महिला, बालके यांचे तक्रारींचे निराकरण करण्यासाठी नव्याने स्थापन करण्यात आलेले ‘भरोसा सेल’ याची माहिती दिली. तसेच त्यांना अडीअडचणी असल्यास संपर्कासाठी पोलीस स्टेशनचा, चौकीचे अधिकारी व स्वतःचा संपर्क नंबर दिले आहेत. पोलीसांनी घरी येऊन त्यांची विचारपूस केल्याने सदर जेष्ठ नागरिक दाम्पत्याने समाधान व्यक्त केले असून आभार व्यक्त केले आहेत.

अशा प्रकारे येरवडा पोलीस स्टेशन कडील पो.उप.निरी. श्री. व्ही.जे.माने व महिला पो.नाईक सुषमा राजे यांनी एकटे राहणारे जेष्ठ नागरिक दाम्पत्याची त्यांचे घरी जावून भेट घेवून, त्यांना मार्गदर्शन करून उल्लेखनिय कामगिरी केली आहे.

---

